दिनांक : २९ .०५ .२०२०

# *लार्क (संमिश्र अपंगत्व ) वार्षिक अहवाल २०१९ -२०२०*

एकूण शिक्षक १९, ऑनररी शिक्षक १, मदतनीस ३, मावशी व काका ५, नविन विद्यार्थी ९, एकूण विद्यार्थी ८१ .

शाळेत एकूण विद्यार्थ्यांचे त्यांच्या शारीरीक, बौध्दिक व मानसिक क्षमताचा विचार करून ९ वर्गाची आखणी केली आहे . त्या व्यतिरिक्त खेळ, क्राप्ट, शारीरक व्यायाम, योगा, कराटे, गायन या ॲाटिव्हिटी विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे चालू आहे . विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे एप्रिलमध्ये अभ्यासक्रमाची आखणी केली जाते . विद्यार्थ्यांना वहया, शैक्षणिक साहित्य पुरविले जाते आणि अभ्यासक्रमाप्रमाणे झेरॉक्स दिल्या जातात . दरवर्षी प्रमाणे चालणारे सर्व उपक्रम नियमीत सुरू आहेत .

## सातत्याने चालणारे उपक्रम

- दरवर्षी प्रमाणे सर्व गटांना वहया व अभ्यासक्रम झेरॉक्स देण्यात आले . शैक्षणिक गटांना अभ्यास पुस्तके व वहया देण्यात आल्या .
- मागील दोन वर्षी प्रमाणे याही वर्षी दर बुधवारी एक तास कराटे प्रशिक्षण विद्यार्थ्यांसाठी चालू आहे .
- दर मंगळवार हा बालकल्याणचा दिवस असतो, त्याप्रमाणे विद्यार्थी बालकल्याण जात होते .
- शैकक्षणिक गट अ,ब,क आणि प्राथमिक गट हे वर्ग यावर्षी पासुन सृजनरंग उपक्रमात मध्ये सहभागी झाले होते .
- दि . २६ .०६ .२०१९ रोजी पालखी कार्यक्रम साजरा झाला . शाळेतील विद्यार्थ्यानी तीन कार्यक्रम सादर केले . सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला .
- दि . २४ .०७ .२०१९ रोजी जीवन ज्योत मंडळाची ५० खाकी पिशव्यांची ऑर्डर मिळाली होती . दि . २५ रोजी कामाचे नियोजन साखळी तयार करून ऑर्डर पुर्ण करण्यात आली . पूर्व व्यावसायिक गट मुली आणि शैक्षणिक गट अ च्या विद्यार्थी आणि सर्व शिक्षकांचे खुप कौतुक आहे .
- **<u>शिक्षक दिन</u>** – दि . ०५ .०९ .२०१९ रोजी शाळेत शिक्षकदिन साजरा झाला, संस्थेतर्फे आणि शाळे तर्फे शिक्षकांना भेटवस्तू देण्यात आली, ही भेटवस्तू विद्यार्थ्यानी तयार केली होती .
  - दि . ०७ .०९ .२०१९ रोजी लायन्स क्लब ऑफ एरंडवणा तर्फे शिक्षकदिना निमित्त शाळेतील शिक्षिका सौ . मनिषा भागवत आणि श्रीमती सविता कदम यांचा सत्कार करण्यात आला .
- दि . ०३ .१० .२०१९ रोजी विद्यार्थ्यांना महात्मा गांधीजी विषयी माहिती देण्यात आली .

- दि . १८ .१० .२०१९ रोजी शाळेत दिवाळी पार्टी झाली, विद्यार्थ्यांना समोसा, लाडू देण्यात आला . विद्यार्थ्यांनी किल्ला केला होता, तसेच रोषणाईचे फटाके वाजवून दिवाळी जल्लोषात साजरी केली . या वर्षी दिवाळी भेट म्हणून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पणत्या देण्यात आल्या, सांगली येथील हरिपुर या गावी दिवाळी उत्सव साजरा करण्यासाठी १०० पणत्या विद्यार्थ्यांनी पाठविल्या .
- दि . १३, १४ व १५ .११ .२०१९ रोजी सृजनरंग तर्फे बालदिना निमित्त आनंदजत्रेचे आयोजन केले होते .
- दि . २२ .११ .२०१९ रोजी शेकोटी हा उपक्रम राबविण्यात आला . लहान गटातील विद्यार्थी रात्री १० .०० वा . पर्यंत थांबली होती तर पूर्व व्यावसायिक गट, शैक्षणिक गट अ आणि ब चे विद्यार्थी रात्री राहायला होती .
- दि . २० .१२ .२०१९ स्नेहसंमेलन – श्रीमती सुनीता सरदेशमुख यांनी श्री गजानन सरदेशमुख स्मृतिप्रित्यर्थ शाळेतील शिक्षकांसाठी कृतिशील शिक्षक पुरस्कार देण्यात आला . या पुरस्काराचे मानकरी सौ . प्रतिभा मुळे आणि सौ .शिल्पा साळवी ठरल्या . मागीलवर्षी पासून मावशीसाठी ही पुरस्कार देणात येत आहे . या पुरस्काराचे मानकरी मावशी श्रीमती जनाबाई सोनावणे या ठरल्या .
- दि . २४ डिसेंबर २०१९ रोजी ख्रिसमस पार्टी करण्यात आली . विद्यार्थ्यांचे फन गेम्स् व जीवन व्यवहार ॲटिव्हिटी घेण्यात आल्या .

## मेडिकल

- दि . ०३ व ०४ .१० .२०१९ रोजी विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप करण्यात आले .

## ISO

- दि . २८ .०८ .२०१९ रोजी इन्टर्नल ऑडीट झाले . हे ऑडीट श्री . प्रवीण चौधरी यांनी घेतले .
- दि . २३ जानेवारी २०२० रोजी ISO चे Surveillance Audit चे ऑडिट झाले .

## सांस्कृतिक कार्यक्रम

| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |
|---|---|---|---|
| ०६ .०६ .२०१९ | पर्यावरण दिन | – | विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक माहिती सांगितली, भित्तीपत्रक तयार केली, वृक्षदिंडी काढली, वृक्षारोपण केले . |
| २१ .०६ .२०१९ | जागतिक योगादिन | – | विद्यार्थ्यांनी योगा प्रात्यक्षिक दाखविले . शिक्षकांनी सूर्यनमस्कार प्रात्यक्षिक सादर केले . |
| १६ .०७ .२०१९ | गुरूपौर्णिमा | सौ . प्रतिभा कुलकर्णी | वक्तृत्व स्पर्धा – स्पर्धेसाठी 'माझे ताई दादा' हा विषय क्षमते प्रमाणे देण्यात आला होता . |
| ०१ .०८ .२०१९ | टिळक पुण्यतिथी | सौ . शिल्पा कौसरकार | अंक मोजणी व पाढे पाठांतर स्पर्धा |
| १४ .०८ .२०१९ | रक्षाबंधन | सौ . स्वरदा गोखले<br>अग्नीशामक दलाचे अधिकारी श्री .निम्हण | चित्रकला स्पर्धा<br>अग्निशामक दला विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली . |
| १५ .०८ .२०१९ | स्वातंत्र्यदिन | | श्री . सरपोतदार सर – सर्व प्रिझम स्टाफ झेंडावंदन करण्यास आले होते . |

| | | | |
|---|---|---|---|
| २३.०८.२०१९ | दहीहंडी | - | छोटा गट<br>मोठा गट |
| ०३.०९.२०१९ | गणेशोत्सव स्पर्धा | - | यावर्षी 'पाणी' हा विषय घेण्यात आला होता. या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध प्रकल्प हॉल सजावटी साठी वापरण्यात आले होते. रोजचा प्रसाद पालक आणि शिक्षकांतर्फे देण्यात आला. शाळेत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. |
| १६.०९.२०१९ | कै. कमलाबाई गोडबोले आंतरवर्गीय कविता पाठांतर स्पर्धा | सौ.सुचिता कुलकर्णी | गटाप्रमाणे कविता सादर केल्या. |
| | शारदोत्सव | - | भोंडला |
| १५.१०.२०१९ | वाचन दिन | | विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार |
| २१.११.२०१९ | क्रीडा दिन | मा. श्री.श्रीधर आखाडे | विविध मैदानी स्पर्धा |
| २०.१२.२०१९ | वार्षिक स्नेहसंमेलन | मा. मंजिरी तिक्का (लेखिका) | विषय : 'भाषा' |
| ११.०१.२०२० | प्रदर्शन | | 'जीवन कौशल्य' आधारीत |
| १७.०१.२०२० | दुकानमेळा व स्टेशनरी दुकान | - | सर्व गटातील विद्यार्थ्यांसाठी यादीप्रमाणे खरेदी विक्री |
| २६.०१.२०२० | प्रजासत्ताक दिन | डॉ. सुनिल गोडबोले | कवायत, योगासन प्रात्यक्षिके व ॲरोबिक्स व यंग ॲथलेटस |
| २७.०१.२०२० | एक दिवसीय सहल | - | 'बालाजी रिसोर्ट' |
| २९ व ३०.०१.२०२० | राहती सहल | - | औरंगाबाद |
| १९.०२.२०२० | शिवजयंती | - | शिवाजी महाराजाचा माहितीपट |
| २७.०२.२०२० | मराठी दिन | - | भाषा विषयक विविध खेळ |
| २८.०२.२०२० | विज्ञान दिन | - | आधारकर अनुसंधान संस्थान येथील जैव विज्ञान विषयक प्रदर्शन पाहण्यास विद्यार्थ्यांना नेण्यात आले होते.<br>शाळेत विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार प्रयोग दाखविण्यात आले. |
| | महिला दिन | - | विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी मनोरंजनाचे खेळ घेतले. |
| | प्रश्नमंजुषा स्पर्धा | - | छोटा गट व मोठा गट अशा स्पर्धा घेण्यात आल्या. |

- दि. २०.०९.२०१९ रोजी कै. कमलाबाई गोडबोले आंतरशालेय स्पर्धा लार्क व एम.ओ.व्ही.एस यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्या व परीक्षक सौ. स्वाती भावे या होत्या. एकूण ७ शाळांनी सहभाग घेतला होता.

## शैक्षणिक सहल

| गट | ठिकाण / स्थळ |
|---|---|
| छोटा गट | बालकल्याण संस्थेतील सेन्सरी गार्डन |
| मोठा गट | बालकल्याण संस्थेतील सेन्सरी गार्डन |
| | डेक्कन चौक - वाहतुक नियमाचे फलक दाखवून नियमांचे महत्व सांगितले . |
| | लॉ कॉलेज चौक आणि भांडारकर प्राचविद्या चौक वाहतुक नियमाचे फलक दाखवून नियमांचे महत्व सांगितले . |

- दि .२४.0७.२0१९ रोजी ३ विद्यार्थ्यांना जुना बाजार येथे नेऊन गॅरेज कामासाठी लागणारे साहित्य खरेदी केले . सध्या शाळेत गाडीच्या चाकाचे नटबोल्ट लावणे व काढणे ही ॲक्टीव्हीटी सुरू केली आहे .

## शिक्षक

- यावर्षी १ नविन शिक्षिका रूजू झाल्या आहेत .
- सौ . प्रतिभा मुळे यांनी मागीलवर्षी कलोपचार कोर्स पुर्ण केला, यावर्षीपासुन पूर्व व्यावसायिक गट अ, पूर्व व्यावसायिक गट ब या वर्गाचे ABT ॲक्टिव्हीटी घेतील .
- सौ . प्रतिभा मुळे आणि सौ . शिल्पा लोंबर या दोन ज्येष्ठ शिक्षकांना प्रत्येकी तीन वर्गाची जबाबदारी दिली आहे .
- सौ . सायली भावे यांना पुर्ण वेळ वर्तन समुपदेशकाची जबाबदारी दिली आहे .
- सौ . श्रध्दा गोरे या विद्यार्थ्यांच्या वर्तन समस्या वर काम करण्यासाठी सोमवार, बुधवार येत आहेत .
- 'Change Teachers' या उपक्रमांतर्गत शाळेतील शिक्षक फिनिक्स शाळेत निरीक्षणसाठी जात होते .

| महिना | शिक्षक | महिना | शिक्षक |
|---|---|---|---|
| जुलै | मनिषा भागवत | फेब्रुवारी | योगिता शेडे व सुनिता चौधरी |
| ऑगस्ट | आरती लोहगावकर | मार्च | |
| | | | |

## विद्यार्थी शाळा सोडण्याबाबत

- या वर्षी १८ वर्ष पुर्ण झाल्या मुळे शाळेच्या ३ विद्यार्थ्यानी माधवी ओगले व्यावसायीक शाळेत प्रवेश घेतला आहे .
- जून पासून गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेकडून पत्र पाठविले आहे .

## Visit / Intership

- फर्गसन कॉलेज मधील ३ विद्यार्थी इटर्नशीप साठी बुधवार, गुरूवार तर १ विद्यार्थी सोमवार, मंगळवार येत आहे .

- दि. २२ ते २६.०७.२०१९ रोजी मुळगांवकर कॉलेज मधील ३ विद्यार्थी पाठ घेण्यासाठी आले होते. मुळगांवकर कॉलेज बी.एड. विशेष शिक्षण दूरशिक्षण अभ्यासक्रमाच्या २ विद्यार्थीनी येत होते.
- ऑगस्ट पासून कर्वे इन्स्ट्टिटयूट चा विद्यार्थी, फर्ग्युसन कॉलेजचे बी.ए. मानसशास्त्राचे ३ विद्यार्थी इंटर्नशीपसाठी येत होते.
- दि. २७.०९.२०१९ रोजी मॉडर्न कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी संस्थेला व शाळेला भेट देऊन माहिति घेतली.
- दि.२०.०२.२०२० रोजी APP DIRECT या कंपनी तर्फे CSR अंतर्गत रोहित सगम आणि प्रचिती जाधव यांनी प्रिझम फौंडेशन व लार्क शाळेची माहिती घेतली. तसेच विद्यार्थ्यांबरोबर काम केले व खेळ खेळले.

## स्पर्धा

| मार्गदर्शक | दिनांक | स्पर्धा | पारितोषिक |
|---|---|---|---|
| सौ.ऋचा जोगळेकर | २१.०८.२०१९ | बालकल्याण - फ्रेम बनविणे स्पर्धा | शाळेला विशेष पारितोषिक सहभागी विद्यार्थी - मिताली जावळकर, श्रध्दा कामेरीकर, ऋतुजा बुदगुडे, मिहीर जगदाळे व आदित्य ढोबळे |
| प्राजंली कुलकर्णी | २८.०८.२०१९ | लायन्स क्लब ऑफ पूना वेस्ट - समुह गायन स्पर्धा | शाळेचा सहभाग |
| सौ. जयश्री कोकणे, सहकार्य शिक्षक - सौ.अमृता कुलकर्णी, श्रीमती योगीता शेंडे | १८.०९.२०१९ | नवक्षितीज - आंतरशालेय नाटय स्पर्धा | शाळेला उत्तेजनार्थ पारितोषिक दिग्दर्शक म्हणून सौ. जयश्री कोकणे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक |
| सौ. शिल्पा साळवी | २४.०९. २०१९ | सोहम योगमित्र संघ योगासन स्पर्धा | ७ विद्यार्थ्यांना पारितोषिके |
| मनिषा भागवत | ०४.१०.२०१९ | लायन्स क्लब दत्तवाडी - नृत्य स्पर्धा | शाळेचा सहभाग |
| विकास जगताप | २९.११.२०१९ | कर्न्सन इंडिया फौंडेशन - विविध स्पर्धा | शाळेला विविध स्पर्धेत १० पारितोषिके शाळेला Best Disciplined Team म्हणून अॅवॉर्ड |
| विकास जगताप<br><br>मनिषा भागवत | ०९.१२.२०१९ | जीवनज्योत मंडळ - मैदानी स्पर्धा व नृत्य स्पर्धा | शाळेला नृत्य स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक |
| | | मालवण खाडी पोहणे स्पर्धा | मिताली जावळकर हीला पाचव्या क्रमाकांचे पारितोषिक |

| मार्गदर्शक | दिनांक | स्पर्धा | पारितोषिक |
|---|---|---|---|
| | २२ व २३.१२.२०१९ | जिल्हा स्तरीय स्पर्धा - पोहणे स्पर्धा | सी.पी गटात विद्यार्थ्यांचा सहभाग |
| विकास जगताप | २३.०१.२०२० | प्राजक्ता मतिमंद मुलांची शाळा सुपे - मैदानी स्पर्धा | २ सिल्व्हर व १ ब्रांझ पारितोषिक |
| | २८.०२.२०२० | कर्न्सन इंडिया फौंडेशन - चित्रकला व विविध खेळ | चित्रकला स्पर्धा - दोन विद्यार्थ्यांना संगीत खुर्ची स्पर्धा - एका विद्यार्थ्यास पारितोषिक |

## कार्यशाळा

- दि. २५.०७.२०१९ रोजी सौ. जयश्री कोकणे व श्रीमती योगीता शेंडे या नवक्षितीज तर्फे घेण्यात आलेल्या 'नाटक कसे बसवावे' या कार्यशाळेत सहभागी झाल्या होत्या.
- दि.२५ सप्टेंबर २०१९ रोजी सावली संस्थेत सौ. स्वाती सगम यांनी 'कृतीयुक्त गणित' या विषयावर व्याख्यान दिले.

## पालक कार्यशाळा

- दि. १०.०८.२०१९ रोजी बेन्यू तर्फे मोठया गटातील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी 'वयात येणा-या मुलांच्या समस्या' या विषयावर कलिका मुजुमदार व शिल्पा लोंबर यांनी कार्यशाळा घेतली. तर छोटया गटातील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी 'आनंददायी शिक्षण' या विषयावर प्रतिभा मुळे यांनी कार्यशाळा घेतली.
- दि. ०८.०२.२०२० रोजी बेन्यू तर्फे पालक कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत श्री. अच्युत बोरगावकर यांनी 'शरीर साक्षरता' या विषयावर कार्यशाळा घेतली.

स्वाती सगम
मुख्याध्यापिका
लार्क